२८ वर्षे. रा. ग्राम पोस्ट आमा ता. नागोद
(म.प्र.) ह.मु. जंगली कोरगाव खदाण येथे - सुपरवायझर
६६६८०५९८०५ मी समक्ष पोलीस स्टेशन कळंब येथे येऊन
तोंडी रिपोर्ट देतो की, वरील पत्त्यावर राहतो व मौजा जंगली
कोरगाव शिवारातील लिलाव बाबू रा. सावनेर यांचे खदा-
णीवर ३ वर्षा पासून सुपरवायझर म्हणून काम पाहतो १ वर्षा
पासून खदाण ही बंद होती. बंद खदाणी मध्ये जमीनीमध्ये
किती प्रमाणात गिट्टा आहे. हे पाहण्यासाठी राजस्थान [illegible]
बोरींग कंपनी कॅटोल यांचा ड्रिलमशीन ऑपरेटर पोखर
शुभदेव गुजर व त्याचा हेल्पर पिंकाजी अभिमन्यु उईके हे
आले होते. काल दि. १८/०६/१७ चे रात्री ११/४५ वा. प्रमाणे
पोखर गुजर व त्याचा हेल्पर पिंकाजी उईके हे खदाणीवर
जमीनीत गिट्टा किती आहे. हे ड्रिलमशीन लावून पाहत होते.
तेव्हा खदाणीचे ऑफीस मधून टिप्पर ड्रायव्हर अजय राकेश
गुप्ता. ड्रिलींगचे काम सुरु आहे. किंवा नाही हे पाहण्यासाठी
टिप्पर क्र. $\frac{MH40}{N6330}$ ने खदाण मध्ये गेला होता. त्याच्या काही
वेळाने पोखर गुजर याचा हेल्पर पिंकाजी उईके हा ऑफीस
मध्ये आला. त्याने सांगीतले की टिप्पर क्र. $\frac{MH40}{N6330}$ चा चालक
काठे रोडवर खाट टाकून झोपलेले पोखर गुजर याला आपला
टिप्पर रिव्हर्स (मागे) घेताना टिप्परचे मागील चाकाने पोखर
गुजर हा आल्याने गंभीर जखमी केले आहे. असे सांगीत-
ल्याने मी पाहण्यास गेलो असता पोखर गुजर हा जागीच
मरणपावल्याचे दिसले. खदाणीच्या टिप्पर क्र. $\frac{MH-40}{N6330}$ चा चालक
अजय राकेश याने आपले टिप्पर निष्काळजीपणे रिव्हर्स घेतानी
हा अपघात केला असून. ड्रिलमशीन ऑपरेटर पोखर गुजर
याचे मरणास कारणीभूत झाला म्हणून मी त्याचे विरुद्ध रिपोर्ट
देण्यास आलो आहे. हिच माझी तोंडी रिपोर्ट आहे. सांगणे
प्रमाणे लिहून वाचून पाहिले बरोबर आहे. सही S D अस्पष्ट
इंग्रजीत

फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन सदर गुन्हा नोंद करुन
तपासात घेतला.

सुजाता मे. JMFC मा. कोर्ट सावनेर यांना रवाना आहे

Asi. R.P. Kedlum
976
19/6/17